दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.५ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 5 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 250 ● Pages 4 ● Rate 4 Rs

**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

## पदाधिकाऱ्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधू नये

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी मेळाव्यात राज ठाकरे यांचे कडक निर्देश

**मुंबई (वृत्तसंस्था)**-आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांना मेळावा घेतला. या वेळी प्रकृती खराब असल्याने आज आपण जास्त बोलणार नसल्याचे राज यांनी म्हटले आहे. या वेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांना मात्र, प्रसार माध्यमांशी संवाद न साधण्याचे कडक निर्देश दिले आहेत.या विषयी मिळालेल्या अधिक माहितीनुसार माध्यमांशी संवाद साधू नका, अशा सूचना महाराष्ट्र निर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. बोरिवली मध्ये मनसेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा पार पडला. यावेळी त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना या महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. आगामी काळात कशा पद्धतीने निवडणुकीला सामोरे जायचे आहे? कोणत्या गोष्टी समोर येणार आहेत? याची सर्व माहिती दिली जाईल. यासाठीच हा मेळावा असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. प्रसारमाध्यमांशी कोणीही संवाद साधायचा नाही. प्रसार माध्यमांशी संवाद साधने हे सर्वांसाठीच बंद केले असल्याचे राज ठाकरे यांनी या वेळी सांगितले. प्रसार माध्यमाचे प्रतिनिधी कोणाकडेही जाऊन तुला काय वाटते? असे विचारतात. मात्र ते ऐकून मला काय वाटते? हे जास्त महत्त्वाचे असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व पक्ष सक्रिय झाले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात समीकरणे तयार केली जात आहेत. मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या प्रमुख महानगरपालिकांच्या निवडणुकाही याच काळात होतील. अशा परिस्थितीत, मनसे प्रमुख राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे दोन्ही भाऊ एकत्र येऊ शकतात असा अंदाज वर्तवला जात आहे. यात राज ठाकरे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांसाठी विभागानुसार अशा मेळाव्यांचे आयोजन केले आहे.



## तळोदा येथे दिव्यांगजणांना आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते साहित्य वाटप



**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा जि.नंदुरबार येथील पंचायत समितीच्या आवारात आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या एडीआयपी योजनेअंतर्गत दिव्यांगजणांना मोफत साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ.किरण पावरा, मुंबई यांनी केले होते. या वाटपामध्ये एकूण ७५ लाभार्थ्यांना विविध साहित्य प्रदान करण्यात आले. यात बॅटरी ऑपरेटेड तीनचाकी सायकली (७), तीनचाकी सायकली (१८), व्हील चेअर (१२), श्रवण यंत्रे (२८), सीपी चेअर (७), कुबड्या (३८), आणि काठी (१४) यांचा समावेश होता. हे साहित्य ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या तपासणी शिबिरात निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना वाटण्यात आले. यावेळी गट विकास अधिकारी राजू किरवे , सहाय्यक गट विकास अधिकारी काशीनाथ पवार, माजी नगराध्यक्ष अजय परदेशी, भाजपा तालुका अध्यक्ष दरबारसिंग पाडवी, शहराध्यक्ष गौरव वाणी, दारासिंग वसावे, जगदीश परदेशी, योगेश मराठे, दीपक कलाल, अमन जोहरी, चेतन शर्मा आणि किरण सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

## जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामास उच्च न्यायालयाची मंजुरी

### केज वकील संघाच्या मागणीला यश

**केज । प्रतिनिधी**

केज येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करण्यास मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी मंजुरी दिली असून, सदर बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता प्रक्रियेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड यांच्या आदेशानुसार बांधकाम विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तावित इमारतीत पुढील सुविधांचा समावेश असणे आवश्यक आहे.




तृतीयपंथीय व्यक्तींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असणे आवश्यक आहे तसेच दिव्यांग,महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी न्यायालयीन इमारतीत प्रवेशयोग्य पायाभूत सुविधा असल्या पाहिजेत.सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाचे पत्र दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ व दिनांक २१ डिसेंबर २०२४ नुसार तयार करण्यात आला आहे.प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंबाजोगाई कार्यालया मार्फत तांत्रिक मान्यते साठी आवश्यक बाबींचा समावेश करून अंतिम अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे.या निर्णयामुळे केज तालुक्यातील न्यायिक कामकाज अधिक सुसज्ज आणि सर्वसमावेशक पद्धतीने पार पाडले जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.केज वकील संघाचे अध्यक्ष अड. एम.एस.लाड यांच्या सह वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी याची मागणी केली होती त्यांच्या मागणीची दखल घेऊन मा.उच्च न्यायालयाने मंजुरी दिली आहे याबद्दल केज वकील संघाच्या वतीने मा.उच्च न्यायालयाचे आभार मानले आहेत.

## मोहिदा ग्रामीण रुग्णालयात बस थांबा देण्याची शिवसेनेची मागणी

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहादा तालुका शिवसेनेने शहादा-कहाटूळ/सोनवद मार्गावरील सर्व बसेसना मोहिदा येथील ग्रामीण रुग्णालयात थांबा देण्याची मागणी केली आहे. तालुका प्रमुख मनलेश जायसवाल यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शहादा आगाराच्या व्यवस्थापकांना याबाबत निवेदन दिले.शहादा शहरापासून सुमारे ७-८ किलोमीटर अंतरावर असलेल्या ग्रामीण रुग्णालयात ये-जा करण्यासाठी रुग्ण आणि कर्मचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रिक्षाचे भाडे ३००-४०० रुपये असल्याने ते परवडणारे नाही, त्यामुळे रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो, असे निवेदनात म्हटले आहे.



बसेसला ग्रामीण रुग्णालयात थांबा मिळाल्यास रुग्णांचा आणि कर्मचाऱ्यांचा आर्थिक भार कमी होऊन वेळेची बचत होईल. शिवसेनेने आगार व्यवस्थापक हरीश भोई यांना निवेदन देऊन येथे बस थांबा फलक लावण्याची आणि सर्व बसेसना थांबा देण्याची मागणी केली आहे.यावेळी शिवसेना तालुका प्रमुख मनलेश जायसवाल, उप जिल्हा प्रमुख राजेंद्र पेंढारकर, माजी नगर सेवक सुपडूभाऊ खेडकर, महानगर प्रमुख लोटन धोबी, राजेंद्र गायकवाड, युवा तालुका प्रमुख राजरत्न बिरारे, मनोज पाथरवट आणि जगदीश ठाकरे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

## महसूल सप्ताह निमित्त पांदण रस्त्याच्या कडेला दुतर्फा वृक्षारोपण

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगांव तहसील कार्यालय महसूल सप्ताह निमित्त आज दिनांक ३ ऑगस्ट रोजी पांदन रस्त्याच्या कडेला दुतर्फा वृक्षारोपण दिन म्हणून साजरा करण्यात आला यात महसूल विभागाच्या वतीने शेळगांव छत्री ते राजगड होळाकडे जाणाऱ्या पांदण रस्त्यावर वृक्ष लागवड करण्यात आली यावेळी उपविभागीय अधिकारी बिलोली क्रांती डोंबे मॅडम, मंडल अधिकारी नायगाव इज्जतपवार सर . शेळगाव छत्रीचे तलाठी हेमंत येशेकर सर श्याम मुंडे नरसी तलाठी दिलीप मध्ये वाढ गोखले गाव तलाठी शिल्पा वाघमारे सुजलेगाव तलाठी शरद देवकांबळे खांडगाव तलाठी शेख इनुस महसूल सहाय्यक सरपंच



संजयराव चोंडे शेळगावकर , प्रगतशील शेतकरी सर्जेराव देशमुख साहेबराव गंगाराम आणि आनेराये गोविंदराव आनेराये संजय जयवंत , किशनराव जयवंतराव आनेराये, बालाजी आनेराये चंद्रकांत लिंगोजी आनेराये, राजेश्वर आनेराये यासह परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते प्रगतशील शेतकरी सर्जेराव देशमुख यांच्या सहकार्याने व तशिलदार कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने पांदण रस्ता झाल्याने शेतकऱ्याला शेताकडे जाण्यासाठी करण्यासाठी चांगला रस्ता मिळाला व त्याच स्पंदन रस्त्यावर प्रगती शेतकरी सर्जेराव पाटील देशमुख यांनी वृक्ष उपलब्ध महसूल सप्ताहाच्या निमित्ताने वृक्षाची लागवड केली.

## लंम्पी आजाराचा पुन्हा शिरकाव; पशुपालक व शेतकऱ्यांनी जनावरांची काळजी घ्यावी

### पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.गौतम खिलारे यांचे आवाहन

**नांदेड । हनुमंत चंदनकर**

जिल्ह्यात पुन्हा लंम्पी आजाराचा प्रादुर्भाव पशुपालक शेतकऱ्यांनी आपल्या गाई म्हशी वासरांची काळजी घ्यावी असे आवाहन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ गौतम खिलारे यांनी केले शेतकरी बांधवांनी आपल्या गोठ्यात जंतू संसर्ग नाशक औषधीची फवारणी करावी , गोमाशी, मच्छर, यांचा बंदोबस्त करावा हमेशा गाय गोटे स्वच्छ करावे वेळोवेळी पशुवैद्यकीय अधिकारी यांचा सल्ला घ्यावा मोकळ्या व हवेशीर जागेत जनावराची व्यवस्था करावी दोन वर्ष आतील सर्व लहान वासरांची विशेष काळजी घ्यावी लंम्पी हा आजार लहान वासरामध्ये मोठ्या प्रमाणावर होतो गोठा परिसरात इतर जनावरे येणार नाही त्यांची काळजी घ्यावी पशुवैद्यकीय कडून लंपी प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे अचानक पणे आपली गाई म्हशी अशक्तपणा वाटत असेल त्वरित डॉक्टरांशी सल्ला घ्यावा जनावरांना व्यवस्थित वेळेवर चारापाणी द्यावे व लंबी हा भयाभ आजारापासून आपल्या जनावरांना दूर ठेवावे असे आवाहन यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले



# हसरी शंभरी

आपल्या व्यंगचित्रांच्या माध्यमातून शब्देवीण संवाद साधणारे ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांनी वयाची शंभरी पार केली. त्यांची ही हसरी इनिंग आपल्यासाठी प्रेरक म्हणायला हवी. शंभरीतले शि. द जुन्याबरोबर नवीन काळाशी नाळ जोडून आहेत. रंगरेषांमध्ये हयात घालवणारा हा माणूस आज एआयविषयी जाणून घेताना दिसतो, तेव्हा त्यांच्या तरुण मनाला मानाचा मुजरा करावासा वाटतो. ही ऊर्जा अशीच टिकून राहो.ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांनी वयाची शंभरी पूर्ण करत ठोकलेले खणखणीत शतक साजरे करताना प्रत्येक चाहत्यांच्या मनात आनंद उचंबळून येणे स्वाभाविक आहे. यानिमित्ताने त्यांचा सत्कार, कौतुक होत आहे. पण हे सगळे सोहळे केवळ त्यांनी वयाची शंभरी गाठली म्हणून नव्हे, तर सकस हास्यचित्रकार म्हणून गाजवलेल्या कारकिर्दीसाठीही आहे. तेव्हा शंभरी आणि प्रदीर्घ कारकीर्द यांचा सहजसुंदर मिलाफ दाखवणारे हे व्यक्तिमत्त्व असेच आरोग्यसंपन्न राहो, ही कामना सर्वप्रथम कराविशी वाटते. शिदंच्या या शंभर वर्षांच्या आयुष्यात हास्यचित्रकार म्हणून केलेला प्रवास जवळपास ७५ वर्षांचा असून तो मराठी मासिकांच्या मुखपृष्ठांना नवीन वळण देणारा आहे. १९५२ मध्ये त्यांचे हास्यचित्र 'मोहिनी' मासिकाच्या मुखपृष्ठावर आले आणि प्रचंड गाजले, कारण तोपर्यंत दिवाळी अंकांच्या मुखपृष्ठांवर सुंदर ललना वा देवादिकांची चित्रेच येत असल्यामुळे एकप्रकारचे साचलेपण आले होते. असे असताना तेथे एक व्यंगचित्रही येऊ शकते, हे शिदंनी दाखवले. अर्थात हे केवळ त्यांचेच श्रेय नसून 'मोहिनी'चे संपादक अनंत अंतरकर यांचेही आहे, पण नंतर सुरू झालेल्या त्यांच्या प्रवासात सातत्य आणि गुणवत्ता हा खूप महत्त्वपूर्ण भाग राहिलेला दिसतो.शिदंनी कारकीर्द सुरू केलेला काळ दीनानाथ दलालांच्या कमालीच्या प्रभावाचाही होता. दलालांचे कामच इतके सुंदर होते की, प्रत्येक नवीन चित्रकारावर त्यांचा प्रभाव असायचा. असे असताना त्यातून बाहेर पडत स्वतंत्र शैली निर्माण करण्याचे काम शिदंनी केले. त्यांची हीच शैली आजही ताजी–टवटवीत आहे. ती कालबाह्य झालेली नाही. अर्थात शिदं इथेच थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या शैलीच्या मर्यादेतही अनेक प्रयोग केले. म्हणूनच एखादे चित्र शिदंचे आहे हे लगेच ओळखता येतेच, त्याचबरोबर त्यातून वेगळेपणही नजरेने टिपता येते. ग्राफीक अंगाने जाणारी चित्रे काढणे, साधे रंग वापरणे, प्रवाहात राहूनही चित्रांमध्ये वेगळेपण जपणे अशी त्यांच्या कामाची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. मात्र हे करताना त्यांनी नेहमीच स्वतंत्र शैली टिकवून ठेवली, हे महत्त्वाचे.त्यांची चित्रे बघताना नेहमीच एक आल्हाद जाणवतो. कामाचे हेदेखील एक वैशिष्ट्य म्हणता येईल. त्यांनी तांबडा वा पिवळा असे भडक रंग वापरले तरी डोळ्यांना खूपत नाहीत, कारण आसपास वापरलेल्या रंगांनी निर्माण केलेले वातावरण चित्र आल्हाददायक करते. त्यात कठोरपणा नावालाही राहत नाही. त्यांच्या चित्रातील आकारही साधे आहेत. इंग्रजीतला 'सपलीफाईड' हा चपखल शब्द यासाठी योग्य ठरेल. पण असे असले तरी चित्रातील प्रत्येक आकार आपले म्हणणे ठसठशीतपणे मांडत असतो. तो या अर्थाने की, त्यांनी चितारलेली कोणतीही फिगर ताठ, सरळ उभी असलेली दिसत नाही. त्यात एक लय असते. शिदंच्या चित्रातील ही लयही फार महत्त्वाची वाटते, कारण त्यामुळेच त्यांचे चित्र अत्यंत आकर्षक दिसते. खेरीज एखाद्याने चित्र कसे बघावे, या दृष्टीने त्यांनी चित्रांची मांडणी केलेली दिसते. म्हणजेच मुख्य विषय काय, तो चित्रात कशा पद्धतीने यायला हवा याचा विचार करूनच त्यांनी चित्र काढलेले असते. यामुळेच बघणाऱ्याला ते कसे पाहावे, याची दृष्टी मिळते.

चित्रांची नक्कल करणे, हुबेहुब चित्र साकारणे हे प्रकार या क्षेत्रात अगदी सर्रास घडतात. असे असताना शिदंच्या स्टाईलची कॉपी फारशी दिसत नाही, हेदेखील एक वैशिष्ट्य वा वेगळेपण म्हणावे लागेल. याचे कारण म्हणजे त्यांच्या चित्रांमध्ये असणारा सोपेपणा हेच खूप अवघड काम आहे! शेवटी हास्यचित्र म्हणजे कला आणि कल्पना यांचा संगम असतो. एखाद्याकडे नुसती कला असून उपयोग नसतो. एखाद्याकडे कल्पना आहे पण कला ती पोहोचवू शकत नसल्यास उपयोग नसतो. या दोन्हींचा समतोल साधला जातो तेव्हाच एक सकस कलाकृती तयार होते आणि अनेक वर्षे टिकून राहते. हा समतोल शिदंच्या चित्रांमध्ये पाहायला मिळतो. कल्पनाचित्रांमधून पूर्णपणे उमटलेले दिसते. म्हणूनच त्यांची चित्रे आजही लक्षवेधी ठरतात. ०आज ते १०० वर्षांचे आहेत. या वयातही त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन जपणे, ही बाब अत्यंत महत्त्वाची म्हणायला हवी. काही वर्षांपूर्वी मंगला गोडबोले यांनी रेडिओसाठी त्यांची मुलाखत घेतली होती. त्यावेळचे त्यांचे एक वाक्य फार सुंदर होते. ते म्हणाले होते की, 'प्रसिद्धी, यश याच्या मागे पळण्याची काही आवश्यकता नसते. तुम्ही रमतगमत, कामाचा आनंद घेत गेला तरी ते मिळू शकते...' त्यांचा हा दृष्टिकोन आजच्या पिढीने आत्मसात करायला हवा. व्यंगचित्रकारितेचा रस्ता चित्रकलेच्या माध्यमातून जातो, असेही ते म्हणतात. म्हणजेच चित्रकलेचा पाया भक्कम, मजबूत असेल तर तुम्ही उत्तम व्यंगचित्र साकारू शकता असे त्यांचे सांगणे आहे. तेव्हा चांगली चित्रकला जमत नाही म्हणून एखाद्याने व्यंगचित्रकलेकडे वळणे योग्य नाही, हा विचार समजून घ्यायला हवा. आज वयाच्या या टप्प्यावर शि. द कमी वेळा कुंचला हातात धरतात. पण कमाल ही की, शंभराव्या वर्षीही त्यांचा हात स्थिर आहे. ते चित्र काढू शकतात. अर्थातच आधी उल्लेख केल्याप्रमाणे यामागे त्यांचा सकारात्मक दृष्टिकोनच कारक आहे, असे म्हणावे लागेल.शिदंना इतरांबद्दल वाईट बोलताना कधीच कोणी ऐकले नाही. पाठीमागे एखाद्याची टिंगल करणे वा त्याच्याबद्दल नकारात्मक बोलणे असे प्रकार कधीही घडत नाहीत. ते नवीन लोकांचे कौतुक करतात. त्यांच्यातील चांगल्या गोष्टींचा आवर्जून उल्लेख करतात. हे कौतुक अगदी मनापासून असते. मितभाषी असले तरी ते थोडक्यात खूप काही बोलून जातात. त्यांच्या बोलण्यात नव्या पिढीला प्रोत्साहन देण्याचाच विचार असतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ते नवीन तंत्रज्ञानाला नाके मुरडत नाहीत. संगणकाचा जमाना सुरू झाला तेव्हा अनेक चित्रकार, व्यंगचित्रकारांनी नाराजी व्यक्त केलेली आपण पाहिली आहे. कागदावर काढलेले चित्र हीच खरी चित्रकला असल्याचे अनेकांनी बोलूनही दाखवले आहे. मात्र शि. द. इथेही वेगळे आहेत. संगणक हे एक टूल असून त्याचा टूल म्हणूनच वापर करा, त्याच्या आहारी जाऊ नका असे ते सांगतात. आज त्यांना एआयबद्दलही उत्सुकता आहे. त्यांनी यासंबंधीची माहिती घेतली आहे. वयाच्या शंभरीमध्ये एआयविषयक एखादा प्रश्न विचारला, तर ते थोडे नक्कीच बोलू शकतील. आपल्या क्षेत्रात त्याचा कसा उपयोग करून घेता येईल, हे सांगतील. ही बाबही अत्यंत महत्त्वपूर्ण म्हणावी लागेल, कारण साठी–सत्तरीनंतरच अनेकांचा नवीन गोष्टींबद्दल जाणून घेण्यातला रस संपलेला असतो. मात्र शिदंनी वाढत्या वयातही उत्सुकता, नवे जाणून घेण्याची उर्मी कोमेजू दिलेली नाही. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी मानवी मेंदू खूप महत्त्वाचा आहे, असे ते म्हणतात. 'एआय साधन म्हणून वापरा, माध्यम म्हणून वापरू नका' हे वाक्य त्यांच्यातील ऊर्जेची प्रचिती देते. शि. द नावाचे गारुड रसिकांना असेच हसवत, शिकवत राहो. त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा!

# आगामी साखर हंगाम फायद्याचा



यंदाचा म्हणजे २०२५–२६चा ऊस हंगाम पावसाच्या पातळीवर अनुकूल राहिला. अजून दोन महिने पावसाचे आहेत. दसरा, दिवाळीला ऊस गाळप होऊन साखर उत्पादन सुरू होईल. इथेनॉलसंबंधी केंद्र सरकारने वेळेवर निर्णय घेतले आणि साखर साठ्यांवर नियंत्रण ठेवले, तर सरकारने १०.२५ टक्के रिकव्हरीच्या उसाला ३५५० रुपये एफआरपी जाहीर केला आहे. प्रत्यक्षात १२.५ टक्के उताऱ्याच्या उसाला प्रतिटन सरासरी ३३०० ते ३५०० निव्वळ मिळण्याची शक्यता आहे. मात्र हे सर्व घटक एकाचवेळी योग्य प्रकारे घडले, तरच हंगाम फायदेशीर ठरेल. अन्यथा परिस्थिती अवघड होऊ शकते आणि त्याचे दुष्परिणाम शेतकरी, कामगार आणि कारखान्यांवर उमटू शकतात.

साखर हंगाम २०२५–२६ दरवर्षीप्रमाणेच नव्या आशा, आकडे आणि आव्हानांसह येत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे ग्रामीण, सोलापूर आणि नगर या जिल्ह्यांमध्ये यंदाच्या हंगामात एकूण ५.४ कोटी मेट्रिक टनांवर ऊस गाळपासाठी उपलब्ध असल्याचे साखर आयुक्त कार्यालयाच्या प्राथमिक आकडेवारीतून समोर आले आहे. यासाठी सुमारे २०० ते २२० साखर कारखान्यांची तयारी असून, सुमारे ५४० लाख टनांपर्यंत ऊस गाळप अपेक्षित आहे. यासाठी लागणाऱ्या एकूण उसाची गरज सुमारे ४७०–४८० लाख टनांच्या घरात आहे. याचा अर्थ असा की, साखर हंगामात गाळप क्षमतेपेक्षा थोडा अधिक ऊस उपलब्ध असून, उसाची पळवापळवी किंवा आडमार्गाने ऊस नेण्याची शक्यता नाकारता येत नाही.


गेल्या वर्षी कोल्हापूर व सांगलीतील काही भागात ही समस्या मोठ्या प्रमाणावर दिसून आली होती. गेल्या तीन हंगामांत शेतकऱ्यांना टनामागे निव्वळ किती रक्कम मिळाली, याचा विचार करता २०२२–२३ मध्ये सरासरी २९५०, २०२३–२४ मध्ये ३०५० तर २०२४–२५ मध्ये सरासरी ३१२० रुपये प्रति टन असा टप्प्याटप्प्याने वाढलेला भाव दिसतो. यामध्ये तोडणी व वाहतूक खर्च, उचल विलंब, फड नंबर इ. बाबी गृहीत धरल्यास शेतकऱ्याच्या हाती प्रत्यक्षात मिळालेली रक्कम थोडी कमीच राहते. सांगली जिल्ह्यात यंदा तोडणी वाहतूक खर्च सुमारे ७७० ते ७९० रु. दरम्यान आहे. त्यामुळे एफआरपी रुपये ३५५० असली तरी १२.५ टक्के प्रमाणे वरच्या २.२५ टक्क्याचे ७७८ रु. तोडणी आणि वाहतुकीला गेले तर शेतकऱ्याला मिळणारा निव्वळ भाव सुमारे ३५५० रुपये येतो. मात्र त्यापेक्षा कमी रिकव्हरीला दर कमी असेल. यंदाच्या हंगामात वातावरणाचा जोर काहीसा उशिरा लागल्याने उसाचे वय काही भागात कमी आहे, मात्र पावसाचे एकूण स्वरूप अनुकूल असल्यामुळे रिकवरीमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे. पुणे ग्रामीण व सातारा जिल्ह्यांमध्ये उसाची सरासरी रिकवरी १०.८% पेक्षा अधिक असून, सोलापूर व नगरमध्ये ती तुलनेत कमी म्हणजेच ९.९% ते १०.२% दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. या रिकवरी दराच्या आधारावर एफआरपी ठरत असल्यामुळे शेतकऱ्यांना किती भाव मिळेल, हे त्यावर ठरणार आहे.

इथेनॉलचा मुद्दा या हंगामातही केंद्रस्थानी

इथेनॉलचा मुद्दा या हंगामातही केंद्रस्थानी असणार आहे. जर इथेनॉल उत्पादनासाठी पुरेसा ऊस वळवला गेला आणि केंद्र सरकारने इथेनॉल खरेदी दर वेळेवर निश्चित केले, तर कारखान्यांच्या लिक्विडिटी स्थितीत सुधारणा होईल. मात्र याच वेळेस साखरेचा साठा जर जास्त झाला आणि निर्यात धोरण अस्पष्ट राहिले, तर साखरेच्या किमतीवर परिणाम होऊ नये म्हणून इथेनॉलकडे साखर वळवावी लागेल किंवा दर चांगले मिळाले, तर निर्यात होईल.

सध्या साखरेचा दर ३६ ते ३७ रुपये प्रति किलोच्या आसपास असून, काही खासगी व्यापारी दरात घट होण्याची शक्यता वर्तवत आहेत. या पार्श्वभूमीवर कारखानदारीसमोरील मोठी आव्हाने म्हणजे ऊस उचल, वेळ, कामगार उपलब्धता, साखर साठ्याची हाताळणी आणि इथेनॉल प्लांट्सची व्यवहार्यता हे आहे. अनेक लघू व मध्यम कारखान्यांना इंधन दरवाढ, थकीत बिले आणि उत्पादन खर्चामुळे गाळपाची सुरळीतता राखणे कठीण होईल. यामधून काही कारखाने स्पर्धेतून बाहेर पडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. शेतकऱ्यांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे म्हणजे गाळप यंत्रणा सुरळीत चालली पाहिजे, ऊस तोडणी वेळेवर झाली पाहिजे आणि साखर कारखान्यांनी एफआरपी पूर्णपणे आणि शक्यतो एकाच हप्त्यात अदा केली पाहिजे. साखर विक्री आणि इथेनॉल उत्पन्नाचा लाभ जर वेळेवर झाला, तर यंदाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी खरोखर फायदेशीर ठरू शकतो.

# दुरावलेला मित्र पुन्हा जवळ!



भारतापासून अतिशय जवळ आणि हिंदी महासागरात व्युहात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या स्थानी असलेल्या मालदीवशी भारताचे संबंध गेल्या दोन वर्षांमध्ये दुरावले होते; परंतु आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यानंतर दोन्ही देशांमधील संबंधांना पुन्हा उजाळा मिळाला आहे. व्यक्तिगत अर्थकारणापेक्षा देशाचे अर्थकारण जास्त महत्त्वाचे असते, याची जाणीव आता मालदीवच्या राज्यकर्त्यांना झालेली दिसते.

केरळच्या किनाऱ्यापासून सुमारे ५०० किलोमीटर अंतरावर असलेल्या जगातील सर्वात लहान मुस्लीम राष्ट्र असलेले मालदीव भारतासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. असे असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मालदीव दौरा सहा वर्षांनंतरच शक्य झाला. कारण चीन आणि पाकिस्तानच्या प्रयत्नांमुळे तेथे निर्माण झालेले भारतविरोधी वातावरण निष्क्रिय करण्यासाठी थोडा वेळ लागला. चीनने हिंद महासागराच्या मुख्य व्यापार मार्गाजवळ असलेल्या या देशावर नजर ठेवायला सुरुवात केल्यापासून भारत आणि मालदीवमधील संबंधांवर परिणाम होऊ लागला होता. या दशकात मालदीवच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याचे आणि आपल्याला अनुकूल सरकार स्थापन करण्याचे प्रयत्न चीन आणि पाकिस्तानकडून होत आहेत; परंतु चीनने मालदीवच्या सागरी क्षेत्रात आपली उपस्थिती निर्माण करण्याच्या उद्देशाने एक बेट भाडेतत्त्वावर घेतले, तेव्हा स्वाभावीकपणे भारताची चिंता वाढली. या बेटाच्या बहाण्याने चीनने केवळ आपली नौदल जहाजे मालदीवमध्ये पाठवण्यास सुरुवात केली नाहीत, तर ती कायमची तैनात करण्याचाही विचार केला. दुसरीकडे, भारताने मालदीवच्या सागरी क्षेत्रांवर लक्ष ठेवण्यासाठी केवळ त्याच्या तटरक्षक दलाशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित केले नाहीत, तर तेथील एका बेटावर आपले रडार केंद्रदेखील स्थापित केले. दोन वर्षांपूर्वी मालदीवने भारतीय सैन्य हटवण्याची सूचना केली. भारताविषयी गरळ ओकली. त्यामुळे भारतीय पर्यटकांनी मालदीवऐवजी अंदमान–निकोबारचा पर्याय स्वीकारला. परिणामी या देशाशी आपले संबंध बिघडले. मालदीवची अर्थव्यवस्था भारत आणि रशियाच्या पर्यटकांवर अवलंबून आहे. मालदीवच्या जीडीपीमध्ये पर्यटनाचा वाटा तीस टक्के आहे. चीनच्या पर्यटकांची संख्या वाढली असली, तरी मुळात तिथले पर्यटक मालदीवला कमी जातात. भारताशी पंगा घेणे मालदीवला परवडणारे नव्हते; शिवाय चीनच्या कर्जाच्या विळख्यात अडकले, तर देश आणखीच अडचणीत येईल, याची जाणीव मालदीवच्या सत्ताधाऱ्यांना झाली. चीनची मदत सहेतुक असते. अडचणीच्या काळात तो मागे उभा राहीलच याची शाश्वती नसते. मालदीवच्या आक्रस्ताळी भूमिकेनंतरही भारताने अतिशय संयत प्रतिक्रिया दिली. भारताने मदत थांबवली नाही, तर मदतीचा हात दिला. त्यामुळे आता आपला खरा मित्र कोण आणि फायद्यासाठी मैत्रीचा हात पुढे करणारा मित्र कोण यातला फरक लक्षात आला.

भारताशी सहकार्य संबंधांशिवाय मालदीव, चीन आणि पाकिस्तानच्या बळावर जास्त काळ टिकू शकत नाही. सुमारे चार दशकांपूर्वी १९८८ मध्ये काही बंडखोर तत्कालीन अध्यक्ष अब्दुल गयूम यांना उलथवून टाकण्यासाठी माले येथे उतरले, तेव्हा त्यांनी भारताकडे मदत मागितली होती. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील तत्कालीन सरकारने गयूम यांची सत्ता वाचवण्यासाठी 'ऑपरेशन कॅक्टस' अंतर्गत भारतीय हवाई दलाच्या वाहतूक विमानातून माले येथे सैन्य पाठवले होते. भारताशी संबंधांवर परिणाम करण्यासाठी पाकिस्तानी गुप्तचर संस्था 'आयएसआय' मालदीवमधील पाच लाख सुन्नी मुस्लीम लोकसंख्येच्या धार्मिक भावना भडकवून भारतविरोधी बनवण्याचा प्रयत्न करत आहे; परंतु हा प्रयत्न यशस्वी होणार नाही, हे मोदी यांच्या दौऱ्यातून स्पष्ट झाले आहे. त्यांच्या मालदीव दौऱ्यादरम्यान पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भारताने मालदीवला सुमारे ४८५० कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली. याचा दोन्ही देशांना फायदा होईल. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे भारताच्या आर्थिक मदतीमुळे मालदीववरील चीनचा कर्जाचा बोजा कमी होण्यासही मदत होईल. मालदीववर चीनचे एक अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त कर्ज आहे. मालदीव पूर्वी चीन आणि इतर देशांना दर वर्षी ५१ दशलक्ष डॉलर्स देत असे. भारताच्या मदतीमुळे आता ही रक्कम फक्त २९ दशलक्ष डॉलर्सवर येईल. यामुळे मालदीवचे चीनवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. मोदी यांच्या या भेटीनंतर आता मालदीवचे नेते आपल्या देशाच्या राजकारणावर प्रभाव पाडण्यासाठी चीन योजत असलेल्या युक्त्या समजून घेतील, अशी आशा निर्माण झाली आहे. भारताने मुइझ्झू यांना चीनच्या प्रभावापासून दूर ठेवून शेजारील देशाशी जुने संबंध पुनर्संचयित करण्यासाठी अभूतपूर्व संयम आणि राजनैतिक कौशल्य दाखवले आहे. चीनसमर्थक मानल्या जाणाऱ्या मुइझ्झू यांनी भारताशी संरक्षण सहकार्याचे संबंध पुनर्संचयित करण्याचे संकेत दिले आहेत. त्याचबरोबर भारताच्या सुरक्षा हितांना हानी पोहोचवू शकेल असे कोणतेही पाऊल उचलणार नाही, असे आश्वासनदेखील दिले आहे. भौगोलिकदृष्ट्या मालदीवला जगातील सर्वाधिक विखुरलेला देश म्हटले जाते. एका बेटावरून दुसऱ्या बेटावर जाण्यासाठी येथे फेरी बोटीचा वापर करावा लागतो. मालदीव १९६५ मध्ये ब्रिटनपासून राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर तीन वर्षांनी मालदीव एक संवैधानिक इस्लामिक प्रजासत्ताक बनले. स्वातंत्र्यानंतर, मालदीवच्या लोकांच्या राजकारणात आणि जीवनात इस्लामला महत्त्वाचे स्थान आहे.२००८ मध्ये मालदीवमध्ये इस्लाम हा राज्य धर्म बनला. मालदीव हा जगातील सर्वात लहान इस्लामिक देश आहे. २६ जुलै रोजी मालदीवचा साठावा स्वातंत्र्य दिन होता. या कार्यक्रमाला मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मोदी यांचा मालदीवचा हा तिसरा दौरा आहे. पूर्वी मालदीव सरकार 'इंडिया फर्स्ट' धोरणाचे पालन करत होते; परंतु मुइझ्झू यांनी हे धोरण संपवण्याचे आश्वासन दिले होते. मुइझ्झू यांनी चीनशी संबंध अधिक दृढ केले होते. भारताने ७.५ अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था असलेल्या मालदीवला दिवाळखोर होण्यापासून वाचवल्यानंतर मुइझ्झू यांचा भारताबद्दलचा दृष्टिकोन बदलला. मालदीव हिंदी महासागरातील प्रमुख सागरी मार्गांजवळ आहे. या मार्गांवरून आंतरराष्ट्रीय व्यापार होतो. या मार्गाने आखाती देशांमधून भारताला ऊर्जा पुरवली जाते. अशा परिस्थितीत मालदीवशी भारताचे बिघडणारे संबंध कोणत्याही प्रकारे चांगले मानले जात नव्हते. भारताच्या आर्थिक आणि धोरणात्मक हितसंबंधांसाठी हा मार्ग खूप महत्त्वाचा आहे. मालदीवशी चांगले संबंध भारताची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करतात. भारताच्या सागरी देखरेखीमध्येही मालदीवचे सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. मालदीव हे भारताच्या लक्षद्वीपपासून सुमारे ७०० किलोमीटर आणि भारताच्या मुख्य भूमीपासून १२०० किलोमीटर अंतरावर आहे. चीनने मालदीवमध्ये नौदल तळ बांधणे भारतासाठी सुरक्षेचे आव्हान निर्माण करते. चीन जगात बलवान झाला, तर युद्धसदृश परिस्थितीत भारतापर्यंत पोहोचणे त्याच्यासाठी खूप सोपे होईल. मालदीवमध्ये चीनचे अनेक प्रकल्प आहेत. अशा परिस्थितीत भारताने सतर्क राहणे आवश्यक आहे. मालदीवचे जनमत अजूनही भारताविरुद्ध आहे. असे असले, तरी भारताने मालदीवच्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली आहे. यापैकी 'ग्रेटर माले कनेक्टिव्हिटी' प्रकल्प हा चीनला टक्कर देण्याचा एक मार्ग म्हणून पाहिला जातो.चीन मालदीवमध्ये २०० दशलक्ष डॉलर्सचा चीन–मालदीव मैत्री पूल बांधत आहे. मालदीवमध्ये चीनची वाढती उपस्थिती भारताच्या सुरक्षेसाठी धोका असल्याचे अनेक विश्लेषकांचे मत आहे. मालदीवने माले विमानतळाजवळील एक बेट चार दशलक्ष डॉलर्समध्ये चीनला ५० वर्षांसाठी भाड्याने दिले. चीन 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' उपक्रमाअंतर्गत हिंद महासागरात आपली उपस्थिती वाढवत आहे आणि त्यासाठी मालदीवमध्ये अनेक प्रकल्पांवर काम करत आहे. दोन वर्षांपूर्वी 'क्वीट इंडिया' धोरण राबवणाऱ्या, भारतीय सैन्याला 'चले जाव' म्हणणाऱ्या मालदीवने आता 'इंडिया फर्स्ट' धोरण जाहीर केले आहे. भारत आणि चीन या दोन्ही राष्ट्रांसाठी मालदीवचे भू–राजकीय स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. चीनने मदत देऊनही मालदीवला पुन्हा भारताशी मैत्री करावी का लागली, याचे उत्तर अर्थकारणात आहे. मोदी आणि मोइझ्जू यांच्या भेटीत संरक्षण आणि सागरी सुरक्षेसह इतर अनेक महत्त्वाच्या क्षेत्रात सहकार्य मजबूत करण्याबाबत व्यापक चर्चा झाली. आता भारत आणि मालदीवमधील संबंधांमध्ये एक नवीन अध्याय सुरू होईल, असे मानले जात आहे. भारताने मालदीवबद्दल संयमाची पातळी दाखवल्यानंतर आता विश्वासाची मैत्री पुढे नेण्यावर भर दिला आहे, त्यामुळे मालदीवसाठी सकारात्मक परिस्थिती निर्माण होईल.

## जिल्हा परिषदेची शाळांची खस्ता हालत


# विद्यार्थी व शिक्षक जीव मुठीत घेऊन शिकवतात व विद्यार्थी शिकतात

### शाळा झाडाखाली भरतात तर जिथे इमारततीथे जीव मुठीत घेऊन विद्यार्थी शिकतात याला जबाबदार कोण?

## माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी







**बीड । प्रतिनिधी**

बीड आम आदमी पार्टीच्या वतीने देशांमध्ये शिक्षणाचे स्थर सर्वात खालच्या दर्जाचे होत आहे व जिल्हा परिषदेच्या शाळा मोडकळीस आणून गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्याचा सरकारचा डाव उलथून टाकण्यासाठी व ज्या पद्धतीने राजस्थानमध्ये शाळेचे छत पडून विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला व पाठीमागे नागपूरमध्ये भिंत पडून विद्यार्थी मृत्युमुखी पडले त्याच पद्धतीने आपल्या बीड जिल्ह्यामध्ये व अजून कोठेही असा हासता होऊ नये म्हणून आम आदमी पार्टीच्या वतीने दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री व शिक्षा मंत्री माननीय मनीष सिसोदिया यांच्या आदेशाने संपूर्ण देशामध्ये शाळांची खस्ता हालत जनतेसमोर आणण्याचे काम आम आदमी पार्टी करत आहे हे करत असताना बीड जिल्ह्यातील शाळांची हालत खूप खस्ता आहे बीड पासून जवळच दहा किलोमीटर वरती असणारे वरवटी या गावच्या कोठुळे वस्ती तालुका जिल्हा बीड या ठिकाणची शाळा पाठीमागील २६ वर्षापासून झाडाखाली भरते त्याला कमरा नाही एक छोटासा शेड दिलेला आहे आणि त्या झाडाखाली शिक्षक आपलं कर्तव्य बजावताना दिसत आहे त्याचबरोबर बीड शहरापासूनच १२ १३ किलोमीटर वरती पिंपळवाडी रोड वरती भाळवणी या गावाजवळ वायकर वस्ती या ठिकाणी त्या शाळेवरती छताच नाही आणि झाडावर खाली काही मुले व काही मुले बिल्डिंगच्या बाजूला बसून शिक्षक शिकवत आहेत पाण्याची व्यवस्था नाही बाथरूमची व्यवस्था नाही जनावरे साईडला बांधलेली गवत डोक्यात उगवलेलं कोणीही त्याकडे बघायला तयार नाही येथून बीड पासून पाच किलोमीटर अंतरावर अंथरवण पिंपरी तांडा तालुका जिल्हा बीड या जिल्हा परिषदेच्या शाळेचे क्षत्रिय पाठीमागे तीन वर्षांपूर्वी पडलेला असून त्या पडलेल्या छतांमध्ये फरशी बसवण्यासाठी पैसे आले आणि चकचकीत नवीन फरशी बसवली गेली परंतु वरी छत तुटलेले दुरुस्त करण्यात आले नाही करण्यात आले नाही पंतप्रधानांची त्यावरती चकचकीत नवीन पाटी लावलेली स्वर्ण महोत्सव मार्बल मध्ये बोर्ड तीन लावण्यात आले आणि ती बिल्डिंग पडलेले आहे त्या पडक्या बिल्डिंगमध्ये शिक्षक आपला कर्तव्य निभवत आहेत व ऊसतोड कामगारांची लेकरं त्या तुटक्या शाळेमध्ये शिकत आहेत कधीही मोठा हात सांगू शकतो याला जबाबदार कोण हे सर्व जनतेसमोर व देशाच्या मालकासमोर आणण्याचे काम आम आदमी पार्टी करत आहे यावेळी या मोहिमेमध्ये माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी माऊली शिंदे जिल्हा बॉडी सदस्य कैलास चंद पालीवाल जिल्हा कोषाध्यक्ष सय्यद सादिक शहराध्यक्ष रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभाग घेत आहे वही मोहीम अशी चालत राहणार आहे

## बीडच्या बॅनरची महाराष्ट्रात चर्चा

# प्रकाश दादा झळकताय पण धनंजय दादा दिसत नाहीत; हा अंधार कोणी केला?

### धनंजय मुंडेंचा फोटो वरून कार्यकर्त्यांचा जाब अजितदादा उत्तर द्या? पक्षात फूट का?

**वडवणी । लोकपत्रकार भांगे**

बीड जिल्ह्यात ६ व ७ ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या नियोजित दौऱ्यापूर्वीच राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. वडवणी येथे बाबरी मुंडे आणि राजाभाऊ मुंडे हे थेट भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश करत आहेत. विशेष म्हणजे, या प्रवेशासाठी माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांचे नेतृत्व असणार आहे.

या पक्षप्रवेशाचं औचित्य साधून बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठे बॅनर्स लावण्यात आले आहेत. या बॅनरवर बाबरी मुंडे, राजाभाऊ मुंडे आणि प्रकाश सोळंके यांचेच फोटो




झळकत असून, या पक्षाचे बीड जिल्ह्यातले मुख्य चेहेरे – माजी मंत्री आणि परळीचे आमदार धनंजय मुंडे यांचा फोटो मात्र अदृश्य आहे. इतकंच नव्हे, तर गेवराईचे आमदार तसेच राष्ट्रवादीचे स्थानिक कार्यकर्ते योगेश श्री सागर यांचेही फोटो या बॅनरवर नाहीत.

या पार्श्वभूमीवर बीडच्या राजकीय वर्तुळात प्रश्न उपस्थित होत आहेत – राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) अंतर्गत कुरबुरी सुरू आहेत का? प्रवेश सोहळ्याचे पोस्टर हे कोणत्याही स्थानिक नेतृत्वाच्या संमतीशिवाय झळकले का? की ही एखादी ठरवून केलेली रणनीती होती?

धनंजय मुंडे यांचा या साऱ्या घडामोडींवर अद्याप कोणताही अधिकृत प्रतिसाद आलेला नाही. मात्र, त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजीचा सूर दिसून येतो आहे. स्थानिक पातळीवर पक्ष संघटनातही यामुळे संभ्रमाचं वातावरण आहे.अजितदादा, तुम्ही पक्षाचे राष्ट्रीय नेते आहात, उपमुख्यमंत्री आहात आणि बीडचे पालकमंत्री देखील आहात, तरीही तुमच्या पक्षात असे खुले मतभेद सुरू असतील तर कार्यकर्त्यांनी नेमकं कुणावर विश्वास ठेवायचा? – असा सवाल सोशल मीडियावर उपस्थित होतो आहे.

या घडामोडींचा पुढील राजकीय परिणाम काय होतो, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे. मात्र, वडवणीतील पक्षप्रवेश कार्यक्रमाआधीच निर्माण झालेल्या या वातावरणामुळे राष्ट्रवादीत अंतर्गत मतभेदांची नांदी झाली असल्याचं स्पष्टपणे जाणवतंय.

## केजमध्ये मेघना बोर्डीकरांचा काळ्या फिती लावून निषेध!



**केज । गौतम बचुटे**

राज्यमंत्री ना. मेघना बोर्डीकर यांनी परभणी जिल्ह्यातील एका कार्यक्रमात बोलताना ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कानाखाली मारण्याची धमकी दिली होती. त्या घटनेचा केज तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या वतीने काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला.परभणी जिल्ह्यातील बोरी परिसरातील १७ ग्रामपंचायत अंतर्गत पंतप्रधान आवास योजने मध्ये घरकुल वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. घरकुल लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीचे पत्र या कार्यक्रमात देण्यात आले. या कार्यक्रमात लाभार्थ्यांची उपस्थिती कमी असल्याने मंत्री महोदयांनी त्याचा राग व्यक्त व्यक्त करून ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना कानाखाली लगावेल अशी धमकी दिली. यामुळे राज्यातील ग्रामपंचायत संघटना आक्रमक झाली आहे. केज येथे ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या वतीने काळ्या फिती लावून निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच राज्यमंत्री बोर्डीकर यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. या आंदोलनात केज तालुका ग्रामपंचात अधिकारी संघांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## इंस्टाग्रामवर सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल




**केज । गौतम बचुटे**

सोशल मीडियाच्या माध्यमातून इंस्टाग्रामच्या अकाउंटवर राष्ट्रपुरुषांच्या बाबत अश्लील आणि अवमान करणारे मेसेज पसरवून सामाजिक भावना दुखावून तेढ निर्माण करणाऱ्या विरुद्ध केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या बनकरंजा येथील सरपंच यांचे पती कृष्णा थोरात यांनी त्यांच्या इन्स्टाग्रामच्या अकाउंटला राष्ट्रपुरुषांच्या जयंती निमित्त अभिवादन करणारे स्टोरी ठेवली. त्यावर एकाने अश्लील आणि अवमानकारक मेसेज व्हायरल केल्याची माहिती त्यांच्या मित्राने त्यांना दिली. त्या नंतर कृष्णा थोरात यांनी त्यांच्या मोबाईलवर सदर इंस्टाग्रामच्या आयडीवर त्या वापरकर्त्याचे इंस्टाग्राम आयडी उघडून पाहिले असता त्याने राष्ट्रपुरुषांची बदनामी करून अश्लील भाषेत स्टोरी व्हायरल केल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणामुळे दोन समाजाच्या भावना भडकून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा त्या इंस्टाग्राम आयडी वापरकर्त्याचा हेतू असावा.

सदर प्रकरणी कृष्णा थोरात यांनी युसुफवडगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून इंस्टाग्राम आय डी वापरकर्त्या विरुद्ध गु. र. नं. १९७/२०२५, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६७ आणि भा. न्या. सं. १९६, २९६, ३५३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे हे तपास करीत आहेत.

## भोजापूर चारीच्या विस्तारीकरणामुळे पाण्याचा प्रश्न सुटणार–पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**शिर्डी । प्रतिनिधी**

भोजापूर चारीच्या विस्तारीकरणासाठी ३० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून लवकरच त्याला मंजुरी मिळणार आहे. दमणगंगा – वैतरणा – गोदावरी नदीजोड प्रकल्पात या चारीचा समावेश झाल्याने लवकरच या भागाचा पाणी प्रश्न सुटणार आहे, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.भोजापूर चारीला तब्बल चाळीस वर्षांनंतर पाणी मिळवून देण्यात यश आले असून, यानिमित्ताने संगमनेर तालुक्यातील तिगाव येथे जलपूजन समारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार अमोल खताळ, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सौ.सोनल शहाणे, जलसंधारण विभागाचे अभियंता हरीभाऊ गीते, उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तसेच लाभक्षेत्रातील शेतकरी व पदाधिकारी उपस्थित होते .पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, जलसंपदा विभागाच्या माहितीनुसार, चारीच्या रखडलेल्या कामासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यामुळे चारीचे काम पूर्ण होऊन प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. चारी आता जलसंपदा विभागाकडे वर्ग झाल्यामुळे भविष्यातील कामांना गती मिळणार



आहे.याशिवाय, चारीच्या विस्तारीकरणाची मागणी लक्षात घेऊन ३० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्याला लवकरच अंतिम मंजुरी मिळेल. या प्रस्तावांतर्गत पाणी वाहतुकीची कार्यक्षमता वाढविणे, पूर नियंत्रण, तसेच अधिक क्षेत्रास सिंचन सुविधा उपलब्ध होईल.भोजापूर चारीचा समावेश दमणगंगा – वैतरणा – गोदावरी नदीजोड प्रकल्पात करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे ३३ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची शक्यता आहे. संबंधित प्रकल्प अहवाल अंतिम टप्प्यात असून, लवकरच अंमलबजावणी सुरू होणार आहे.भविष्यात साकूर व पंचक्रोशीतील गावांचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र योजना तयार करण्यात येत असून, त्याचाही प्रारंभ लवकरच करण्यात येईल,असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.आमदार अमोल खताळ यांनी ही मनोगत व्यक्त केले.

# सोनेसांगवी येथील भारतीय सैन्य दलातील जवान बाबाराजे दहिभाते यांचा खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत सत्कार

## रस्त्यावर रांगोळी काढून फुलांची उधळण करीत काढली गावातून वाजत गाजत मिरवणूक!






### गावातून काढली मोटार सायकल रॅली

सैनिकाचा सत्कार करताना गावकरी आणि तरुणांनी गावातून एक मोटार सायकल रॅली देखील काढून सैनिकाचा सन्मान केला

### चार पिढ्यांचा सत्कार

बाबाराजे दहिभाते यांच्या सेवा पूर्ती सत्कार प्रसंगी त्यांची ८० वर्षांच्या आजी इंदुबाई दहीभाते, राजुबाई व सर्जेराव दहीभाते हे आई वडील, त्यांची पत्नी आणि दोन्ही लहान मुले असे चारही पिढ्यांचे सदस्य उपस्थित होते.

**केज । गौतम बचुटे**

भारतीय सैन्य दलात सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या एका जवानाचा गावकऱ्यांनी गावातून वाजत गाजवत आणि उघड्या जीप मधून वाजत गाजत मिरवणूक काढली. तसेच रस्त्यावर रांगोळी काढून फुलांची उधळण करीत खा. बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत भव्य असा सत्कार करण्यात आला. दि. ३ ऑगस्ट रोजी केज तालुक्यातील सोनेसांगवी येथील भारतीय सैन्य दलातील जवान बाबाराजे दहिभाते यांनी २० वर्ष सैन्य दलात सेवा केल्या नंतर ते सेवा निवृत्त झाले. आपल्या गावचा आणि मातीतील जवानाने डोळ्यात तेल घालून, आपले शीर तळहातावर घेऊन केलेल्या देशसेवेचा त्यांचे गावकरी आणि मित्रांना सार्थ अभिमान असल्याने त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा सत्कार करण्यात आला. या वेळी गावकऱ्यांनी रस्त्यावर सडा सारवण करून रस्त्यावर रांगोळी काढल्या होत्या. त्यांच्या कुटुंबाला फुलांनी सजविलेल्या उघड्या जीप मधून वाद्यांच्या गजरात वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. रस्त्यात महिलांनी त्यांचे औक्षण केले. तसेच त्यांच्यावर फुलांची उधळण करण्यात आली. या सत्कार प्रसंगी बीड जिल्ह्याचे खा. बजरंग सोनवणे, भाजपचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, माजी सभापती ज्ञानेश्वर चवरे, प्रा. हनुमंत भोसले सर, ह.भ.प. गणेश महाराज जोगदंड आणि अबालवृद्ध उपस्थितीत होते. यावेळी बोलताना खा. बजरंग सोनवणे म्हणाले की, भारतीय सैनिक डोळ्यात तेल घालून आपल्या देशाच्या सीमेचे रक्षण करीत असल्यामुळेच आपला देश आणि आपण सुखरूप आहोत. गावकऱ्यांनी बाबाराजे दहिभाते आणि त्यांच्या कुटुंबियांचा केलेला सत्कार याचा सार्थ अभिमान असून असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. तसेच नंदकिशोर मुंदडा यांनी देखील त्यांना शुभेच्छा दिल्या आणि बदल घडविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवा असे देखील म्हणाले. या सेवापूर्ती सत्कार सोहळ्याला बब्रुवाहन कणसे, आप्पासाहेब इखे, माणिक गुळवे, विजयकुमार इखे, मुकुंद कणसे, अमोल गुळवे, शिवाजी नाईकवाडे, ज्ञानोबा देवकर, बिभीषण नाईकवाडे, मनोहर ईटकर, दशरथ नाईकवाडे यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थी महिला यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संयोजक बब्रुवाहन कणसे यांनी तर संचलन अमोल गुळवे यांनी केले.

बाबाराजे दहिभाते यांच्यासारख्या सैनिकांमुळेच देश आणि देशाच्या सीमा सुरक्षित असून त्यांच्यामुळे आपण सुखरूप आहोत. देशाच्या सैनिकांचा सर्वांना अभिमान आहे.

–खा. बजरंग सोनवणे

बाबाराजे दहिभाते यांचा गावकऱ्यांनी केलेला सत्कार हा स्तुत्य असून प्रत्येकाने देशासाठी योगदान देणे आवश्यक आहे.

–नंदकिशोर मुंदडा

### ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभाग

पुलवामा हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय सेनेने अतिरेकी आणि त्यांना मदत करणाऱ्या पाकिस्तान विरुद्ध केलेल्या ऑपरेशन सिंदूर मध्ये बाबाराजे दहिभाते त्यांच्या तुकडीने आर्मी एअर डिफेन्स, वायू रक्षा मिसाईल यामध्ये ते सहभागी झाले होते.

### भाऊ, मेव्हणा आणि पत्नी देखील सेवेत

बाबाराजे दहिभाते यांचा लहान भाऊ संदीप दहिभाते हे देखील बिकानेर येथे सैन्य दलात सेवेत असून त्यांचा मेव्हणे हे सुद्धा सैन्यद लातून सेवानिवृत्त झालेले आहेत. तर त्यांची पत्नी राणी दहिभाते या बीड पोलीस दलात सेवेत आहेत.

# ग्रामीण विभाग केज २ ची ९२ टक्के विजयी वसुली अधिकारी कर्मचाऱ्यांचे केले कौतुक



**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या केज ग्रामीण पथक २ यांच्याकडे जुलै २०२५ साठी विज बिल वसुली चे ३२ लाखांचे उद्दिष्ट होते.अथक प्रयत्नांमुळे विभागाने २९ लाख रुपये विज बिल वसूल करून ९२ टक्के वसुली चा टप्पा गाठला आहे.

या उल्लेखनीय यशाचे श्रेय उप कार्यकारी अभियंता सय्यद मिनाजोदीन यांच्या प्रभावी मार्गदर्शनाला जात आहे,तसेच सहाय्यक अभियंता बोराटे मॅडम यांनी उत्कृष्ट नियोजन करत हे उद्दिष्ट जवळपास गाठले.यशस्वी वसुली मध्ये योगदान देणारे कर्मचारी गोपाळ मुंडे, आदिनाथ मुंडे,गजानन पांचाळ,संतोष कराड, प्रवीण सांगळे,राम सोळंके,अशोक वैरागे, राजाभाऊ राठोड, सतीष तांदळे या सर्वांनी संघ भावनेने मेहनत घेतली.उप कार्यकारी अभियंता सय्यद साहेब व मुख्य तंत्रज्ञ विष्णु तेलंग यांनी सर्व टीमचे अभिनंदन करत त्यांच्या प्रयत्नांना सलाम केला आहे.विज बिल वसुलीत केज ग्रामीण-२ हे आदर्श ठरले असल्याने अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

# वंचित बहुजन आघाडीची गेवराई येथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात आढावा बैठक संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गेवराई येथे एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. ही बैठक सोमवारी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह, गेवराई येथे आयोजित करण्यात आली होती.बैठकीला बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तर तालुका अध्यक्ष अजयकुमार (पप्पु) गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी आगामी निवडणुकांसाठी रणनीती आखणे, संघटन बळकट करणे आणि प्रचाराची दिशा निश्चित करणे या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली.




तालुक्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, महिला कार्यकर्ते, वंचित बहुजन आघाडीचे स्थानिक नेते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक प्रश्न, मतदारांची अपेक्षा, निवडणुकीतील आव्हाने व पक्षाचे धोरण यावरही विचारविनिमय करण्यात आला.या बैठकीतून वंचित बहुजन आघाडीने तालुकास्तरावर संघटन मजबूत करून आगामी निवडणुकांमध्ये निर्णायक भूमिका बजावण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी धम्मानंद साळवे, राजाभाऊ पोकळे, खंडू नाना जाधव, संदीप रोकडे, अर्जुन जवंजाळ, भीमराव चव्हाण,अजय कुमार गायकवाड, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, किशोर भोले, ज्ञानेश्वर हवाले, प्रमोद निकाळजे, किशोर चव्हाण, प्रदीप शिंदे, अनिल बोराडे, किरण गायकवाड, सचिन कांडेकर,अंकुश जाधव, नवनाथ त्रिभुवन, विकास बनसोडे, विनोद थोरात, अशोक पवार, संजय शरणांगत, रोहित कदम, नामदेव भिसे, मिलिंद तायड, महादेव वीर,कृष्णा सामसे, सुधाकर केदार, राहुल त्रिभुवन, उदय तुपारे, सुभाष बांगर, प्रकाश सदाफुले, आत्माराम सदाफुले, विनोद पोटफोडे, अनिल साळवे, किशोर मोहिते, धोंडीबा पंडित, विजय निकाळजे, स्वप्निल जोगदंड, माणिक राठोड, वैभव पोटफडे, बाबासाहेब प्रधान, साईनाथ सुतार, सतीश नाडे, अशोक थोरात, नवनाथ थोरात, कृष्णा हातागळे, विजू खरात, बाबुराव पोटभरे यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते..

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिकशाळा तरनळी शाळेत

# क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

**केज । प्रतिनिधी**

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे,उपाध्यक्षा सीमा सुधीर मोहिते,जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करूनअभिवादन केले.क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील बहे या गावी आजोळी दि.३ ऑगस्ट १९०० रोजी झाला.त्यांचे मुळ गाव येडे मच्छिंद्र आहे. वडिलांचे नाव रामचंद्र पाटील व आईचे नाव लक्ष्मीबाई होते.ते भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी राजकारणी होते.त्यांनी अंधश्रद्धा,हुंडा पद्धत या अनिष्ट प्रथा,चालीरीती बाबत जनजागृती केली ब्रिटिशांच्या अन्यायी राजवटीस आव्हान देऊन क्रांतिकारक मार्गाचा पुरस्कार केला. जबरीने सारा वसूल करणारास पायावर काठीने मारत व पत्रेही ठोकण्यात येत.त्यांची ग्रामराज्य स्थापन करण्याची




कल्पना होती.ते कॉँग्रेस पक्ष सोडून कम्युनिस्ट पक्षात जाऊन दोन वेळा लोकसभेवर निवडून आले व खासदार झाले. ते बीड लोकसभा मतदार संघात १९६७ मध्ये निवडुन आले. त्यांना प्रती सरकार किंवा पत्री सरकार म्हणुन ओळखले जात असत.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले. श्री.बाळासाहेब भिल्लु राठोड सर यांनी सविस्तर माहिती दिली. श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम, श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम,ट्रेनी शिक्षिका सीमा सुधीर मोहिते मॅडम,शिक्षक श्री.भारत बाबुराव हांगे सर,श्री. बाबासाहेब राजाराम मैंद सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन इयत्ता ७ वी ची श्वेता सुहास सरवदे यांनी केले.आभार भाग्यश्री ओमप्रकाश मोहिते यांनी मानले व कार्यक्रम संपन्न झाला.

# आदर्श विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणूक उत्साहात संपन्न



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बनसारोळा येथे दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यार्थी संसद निवडणूक मोठ्या उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध खात्यांसाठी मंत्री निवड करण्यात आले.

या निवडणुकीत विद्यार्थी प्रतिनिधी प्रतीक महादेव पौळ वर्ग १२ वी विज्ञान आणि संकेत मनोज पांचाळ वर्ग दहावी , आरोग्य मंत्री राधिका किरण बोरगे वर्ग नववी ब, अक्षरा गुणवंत गायकवाड वर्ग नववी अ, स्वच्छता मंत्री काकडे तेजस्विनी शुकलेश्वर काकडे वर्ग आठवी ब , क्रीडा मंत्री आर्यन विठ्ठल काकडे वर्ग आठवी ब संगमेश्वर मारुती शिंदे वर्ग नववी ब , शालेय शिस्त मंत्री हर्षवर्धन श्रीपाद गोरे वर्ग सातवी अ अधिराज ज्ञानेश्वर रोकडे वर्ग सातवी अ, वृक्षारोपण मंत्री गणेश सतीश पौळ वर्ग बारावी कला, प्रतीक महादेव पौळ वर्ग बारावी विज्ञान, सांस्कृतिक मंत्री श्रद्धा अनिल जोगदंड वर्ग आठवी अ, राधा गणेश करंजकर वर्ग बारावी विज्ञान आणि विद्या मंत्री अक्षरा अमोल गोरे वर्ग दहावी अ, संकेत मनोज पांचाळ वर्ग दहावी अ अशी विविध पदे विद्यार्थ्यांमध्ये वाटप करण्यात आली. सर्व पदाधिकारी विद्यार्थ्यांची निवड निवडणूक प्रक्रियेद्वारे करण्यात आली.या उपक्रमात मुख्याध्यापक सौ. सिंधुताई चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक विभागप्रमुख श्री. संतोष रोकडे व श्री. शिवाजी मांदळे यांनी नियोजनाची जबाबदारी पार पाडली.हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077